# पदव्युत्तर पदवी विद्यार्थिनींच्या दृष्टिकोनातून स्त्रियांचा समाजातील बदलत्या भूमिकांचा अभ्यास

**सादरकर्ते श्रीमती. प्रतिक्षा विलास माने** बी.एड. एम.एड. (एकात्मिक)शिक्षणशास्त्र अधिविभागशिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

सहयोगी प्राध्यापिका **डॉ.श्रीमती रूपाली उत्तम संकपाळ** शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**सारांश**

महिलांना समाजात महत्त्वाच्या भूमिका पार पाडाव्या लागतात. वैयक्तिक आणि व्यावसायिक दोन्ही क्षेत्रांमध्ये त्यांच्या भूमिका ओळखल्या जातात. असे म्हटले जाते की, एखाद्या स्त्रीला शिक्षण दिले तर संपूर्ण कुटुंब शिक्षित होते. महिलांच्या मुख्य भूमिका घरगुती जबाबदाऱ्या पार पाडणे आणि कुटुंबातील सदस्यांच्या गरजा आणि आवश्यकता पूर्ण करण्याच्या संदर्भात ओळखल्या जातात. जेव्हा महिला शिक्षण घेत असतात किंवा विविध प्रकारच्या नोकऱ्यांमध्ये गुंतलेल्या असतात, तेव्हा त्यांना आपल्या जबाबदाऱ्या योग्य प्रकारे पार पाडाव्या लागतात. नोकरीसंबंधी कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या नीट आणि समाधानकारक पद्धतीने पार पाडण्यासाठी, त्यांना आवश्यक उपाय आणि दृष्टिकोनांची माहिती असणे गरजेचे आहे. सध्याच्या काळात, महिला वेगवेगळ्या प्रकारच्या नोकऱ्यांमध्ये कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांना आपल्या कामाच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्यांची पूर्ण जाणीव असणे आवश्यक आहे. त्यांना वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवन यामध्ये संतुलन साधावे लागते. म्हणजेच, त्यांना सर्व कामे करण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा लागतो. म्हणूनच, या जबाबदाऱ्या योग्य आणि समाधानकारक पद्धतीने पार पाडण्यासाठी स्त्रियांना संसाधन संपन्न आणि माहितीपूर्ण असणे आवश्यक आहे.

**प्रस्तावना**

भारतीय समाज मुख्यत: पुरुषप्रधान आहे. अर्थात, केरळमधील नायर, मंगळूरमधील शेट्टी, बंगाली समाज व काही भटक्या जमातींमध्ये स्त्रीप्रधानतेचे प्रमाण दिसते. परंतु, सर्वसामान्यपणे विचार करता, भारतीय समाजामध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान असल्याचे प्रकर्षाने जाणवते. त्यातच अनेक रूढी, परंपरा (अनेक धर्मातील) यांमुळे स्त्रियांवर अन्याय, शोषण, सामाजिक विभक्तीकरण झाल्याचे दिसते. स्त्रियांना सार्वजनिक जीवनातील सहभाग नाकारण्यात आला. या पार्श्वभूमी भारतात स्त्रियांची भूमिका, त्यांचे शोषण, न्याय्य अधिकार यावर आधारित चळवळी व संघटना उभ्या राहिल्या. भारतातील स्त्री-चळवळीचे तीन टप्पे करता येतील-पहिला टप्पा (१८३०-१९१५); दुसरा टप्पा (१९१५-१९४७) तिसरा टप्पा (१९४७ पासून पुढे).पहिल्या टप्प्यामध्ये मुख्यत: काही पुरोगामी पुरुषांच्या पुढाकारामुळे महत्त्वाचे बदल घडताना दिसतात. यामध्ये सती-बंदी (१८२९), विधवा पुनर्विवाह कायदेशीर मान्यता (१८५६), स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंध (१८७०), आंतरजमातीय विवाहास मान्यता (१८७२) समंती वयामध्ये वाढ (१८९१) यांचा समावेश होतो. यासंदर्भात ईश्वरचंद्र विद्यासागर, पंडिता रमाबाई, राजा राममोहन रॉय, धोंडो केशव कर्वे, सुब्बलक्ष्मी, जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे कार्य महत्त्वाचे ठरते. दुसऱ्या टप्प्यामध्ये भारत महिला परिषद, भारत स्त्री महामंडळ, विमेन्स इंडियन असोसिएशन (WIA), नॅशनल कौन्सिल ऑफ विमेन फॉर इंडिया, ऑल इंडिया विमेन्स कॉन्फरन्स (AIWC) या संघटनांचा उदय होतो. या संघटित चळवळीद्वारे प्रांतामध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार (१९२१), बालविवाह प्रतिबंधक कायदा (१९२९), स्त्रियांना मर्यादित प्रमाणात मालमत्तेचा हक्क (१९३७) यांसारखे महत्त्वपूर्ण बदल झाले. स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री-चळवळीचे पुन्हा तीन टप्पे करता येतील. [गुरव, च. (2015, नोव्हेंबर 16). भारतीय समाजातील स्त्रियांची बदलती स्थिती. लोकसत्ता.] भारतीय समाजातील स्त्रियांची बदलती स्थिती १९४७ पासून ते १९७० च्या दशकापर्यंत राष्ट्र बांधणीच्या कार्याला प्राधान्य दिले गेले. अर्थात संविधानात अंतर्भूत मूलभूत हक्क व राज्याची मार्गदर्शक तत्त्वे यांमध्ये स्त्रियांचे हक्क व अधिकार यांना योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला गेला. पण, या तरतुदींच्या अंमलबजावणीतील अपयशामुळे १९७० च्या दशकात स्त्री-चळवळीचा स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दुसरा टप्पा सुरू झाला. या टप्प्यामध्ये असमान वेतन, स्त्रियांचे 'अकुशल' कामगारांत वर्गीकरण, विनामोबदला श्रम, सामाजिक संस्थांमधील (जात, धर्म, वर्ग, कुटुंब इत्यादी) सत्तेच्या संरचनेतली पुरुषी वर्चस्व या समस्यावर भर होता. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील २१ व्या शतकातील टप्प्यामध्ये स्त्री-चळवळ स्त्री-पुरुष समानतेच्या पलीकडे जाऊन स्त्रियांची वैयक्तिक जीवन ठरवण्याची सत्ता, त्यांच्या भूमिका व त्यांचे सक्षमीकरण यांसारख्या घटकांवर प्रकाश टाकते.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1) पदव्युत्तर पदवी विद्यार्थीनींच्या दृष्टिकोनातून स्त्रियांच्या समाजातील भूमिकांचा अभ्यास करणे .

2) पदव्युत्तर पदवी विद्यार्थीनींच्या दृष्टिकोनातून स्त्रियांच्या समाजातील बदलत्या भूमिकांचा अभ्यास.

3) अभ्यासाआधारित महिलांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी पूरक उपाययोजना सुचवणे.

**संशोधन प्रक्रिया**

**संशोधनाचा नमुना**

सध्याच्या अभ्यासासाठी संशोधकांनी शिक्षणशास्त्र अधिविभागातील पदव्युत्तर पदवीच्या स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड सहेतुक पद्धतीने केली आहे.

**संशोधन पद्धत**

प्रस्तुत संशोधन हे वर्तमान स्थितीशी निगडित आहे म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केलेला आहे.

**माहितीचे संकलन**

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी माहिती संकलनाचे प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोत वापरण्यात आले आहेत. यामध्ये शिक्षणशास्त्र अधिविभागातील तीस पदव्युत्तर पदवीच्या स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रश्नावलीच्या सहाय्याने माहिती गोळा करण्यात आली आहे.

**संशोधन प्रक्रिया**

सदर संशोधनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आणि सदर संशोधनाची उद्दिष्ट पूर्ती पुढील प्रमाणे करण्यात आली.

**संशोधनाची उद्दिष्टानुसार कार्यवाही**

सदर संशोधनाचे उद्दिष्ट क्रमांक १ ची पूर्तता पुढीलप्रमाणे

1] पदव्युत्तर पदवी विद्यार्थीनीच्या दृष्टिकोनातून स्त्रियांच्या समाजातील भूमिकांचा अभ्यास करणे.

समाजातील महिलांच्या भूमिका विविध आणि महत्त्वपूर्ण आहेत, ज्यामुळे कुटुंब आणि समाजाच्या कल्याणासाठी त्यांचे मोठे योगदान आहे. महिलांवर अनेकदा घरातील वृद्ध व्यक्तींची काळजी घेण्याची जबाबदारी असते. त्या वृद्ध कुटुंब सदस्यांच्या गरजा पूर्ण करतात, ज्यामध्ये पौष्टिक आहार आणि औषधोपचार वेळेवर दिले जाते. अनेक महिला आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलांची शिकवणी घेतात. ही शिकवणी अनेकदा विनामूल्य घेतली जाते. आणि ग्रामीण भागातून शहरी भागात आलेल्या मुलांच्या साक्षरता कौशल्यांना सुधारण्याचे उद्दिष्ट असते. सामाजिक कार्यात सहभागी असलेल्या महिलांना सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांतील लिंगाधारित भूमिकांमुळे विविध आव्हानांचा सामना करावा लागतो. त्या लिंग समानतेसाठी समर्थन करतात आणि सामाजिक संरचना बदलण्यासाठी कार्य करतात. महिला अनेकदा समाजातील कार्यक्रमामध्ये सहभागी होतात, ज्यामुळे समाजातील लोकांचे कल्याण होण्यास मदत होते. त्या कार्यक्रमांचे आयोजन, संसाधनांची उपलब्धता तसेच समाजामध्ये आरोग्यदायी, आनंददायी वातावरण ठेवण्यासाठी नियमांचे काटेकोरपणे पालन करतात. महिला त्यांच्या कुटुंबांतील घरगुती हिंसा आणि गुन्हेगारी कृत्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी भूमिका बजावतात. [कपूर,र.(2021).समाजातील स्त्रियांच्या भूमिकांचे आकलन.] त्या अनेकदा इतर महिलांकडून मदत घेतात आणि अशा समस्यांच्या निराकरणासाठी चर्चा करतात.

सदर संशोधनाचे उद्दिष्ट क्रमांक २ ची पूर्तता पुढीलप्रमाणे

2] स्त्रियांच्या समाजातील बदलत्या भूमिकेबाबत विद्यार्थीनींचा प्रतिसाद




या सर्वेक्षणानुसार,विद्यार्थीनीना गेल्या दशकात समाजातील स्त्रियांच्या लैंगिकता, नातेसंबंधामध्ये परिवर्तन, शासकीय योजनांचा प्रभाव इ भूमिकेत झालेल्या महत्वपूर्ण बदलांविषयी माहिती आहे. स्त्रिया आज शिक्षण, आरोग्यसेवा, तंत्रज्ञान ,राजकारण, कला, संस्कृती या व्यावसायिक क्षेत्रांमध्ये सक्रिय आहेत हे पहावयास मिळते. स्त्रियांच्या व्यवसायिक प्रगतीमध्ये लैंगिक भेदभाव, कौटुंबिक जबाबदाऱ्या, शिक्षणाची कमतरता, सांस्कृतिक मर्यादा हे घटक अडथळे आणतात . स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षणाची संधी, कौशल्य विकास कार्यक्रम, समान वेतन धोरण इत्यादी प्रकारच्या उपाययोजना प्रभावी ठरू शकतात. समाजामध्ये स्त्रियांना लैंगिक भेदभाव आणि असमानता या आव्हानांचा सामना करावा लागतो. स्त्रियांच्या

सक्षमीकरणासाठी शिक्षण व कौटुंबिक समर्थन, आर्थिक स्वावलंबन, राजकीय सहभाग, कायदेशीर संरक्षण, निर्णय क्षमता इत्यादी घटक सर्वात महत्त्वाचे आहेत. विद्यार्थिनींना त्यांच्या शैक्षणिक जीवनात लिंगभेद किंवा असमानतेचा अनुभव आला आहे. स्त्रियांना व्यावसायिक क्षेत्रात लैंगिक भेदभाव, कौटुंबिक जबाबदाऱ्या, वेतनातील असमानता, कामाच्या ठिकाणी होणारा छळ अशाप्रकारच्या प्रमुख अडचणींचा सामना करावा लागतो. समाजामध्ये स्त्रियांच्या बदलत्या भूमिकांबद्दल लोकांचे दृष्टिकोन सांगता येत नाहीत. स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी सांस्कृतिक बदल घडून येणे अत्यंत आवश्यक आहे. स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण प्रणाली व आरोग्य सेवा या क्षेत्रांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. पुढील पाच वर्षात समाजातील स्त्रियांच्या भूमिकेत सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तन होणे अपेक्षित आहे. स्त्रियांच्या बदलत्या भूमिकेबद्दल विद्यार्थिनींनी निरीक्षणे नोंदवली आहेत की स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात पुढे जात आहेत पण अजूनही समाजात स्त्रियांना उपभोग्य वस्तू म्हणून पाहण्याची मानसिकता कायम आहे.

सदर संशोधनाचे उद्दिष्ट क्रमांक ३ ची पूर्तता पुढीलप्रमाणे

3] अभ्यासाआधारित महिलांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी पूरक उपाययोजना सुचवणे.

प्रस्तुत संशोधन अभ्यासवरून असे दिसून येते की ,स्त्रियांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि कौशल्य विकास कार्यक्रम उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यामुळे त्यांना विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये संधी मिळतील. स्त्री-पुरुष समान कार्यासाठी समान वेतन सुनिश्चित करणारे धोरण राबविणे गरजेचे आहे स्त्रियांवरील अत्याचार आणि भेदभाव रोखण्यासाठी कठोर कायदे आणि दंडात्मक तरतुदी करणे आवश्यक आहे. स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी समाजातील रूढीपरंपरांच्या विचारसरणीत बदल घडवून आणणे आवश्यक आहे. यासाठी जनजागृती आणि प्रबोधन कार्यक्रम राबविणे उपयुक्त ठरेल.

**निष्कर्ष व चर्चा**

समाजातील स्त्रियांच्या भूमिकेत लक्षणीय बदल झाले आहेत, परंतु अद्यापही अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, आणि सांस्कृतिक बदल आवश्यक आहेत. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी स्त्रियांच्या सक्षमीकरणाला प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे. मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीला वागविले पाहिजे. केवळ ती स्त्री आहे म्हणून डावलले जाऊ नये. तिला रोजगाराच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत. टेलिफोन ऑपरेटर, नर्स, असिस्टंट, स्टेनो आणि सेक्रेटरी या कामासाठीच विशेष करून सुंदर दिसणाऱ्या स्त्रियांची निवड केली जाते. परंतु तिला जर संधी दिली तर ती आपल्या कर्तुत्वाचा ठसा इतर क्षेत्रातही उमटवू शकते. तिला अधिकाराच्या जागा मिळाल्या पाहिजेत, तिला समान वेतन मिळाले पाहिजे. म्हणूनच व्हर्जिनिया उल्फ म्हणते स्त्रियांनी लिहिले पाहिजे. त्यांचा आवाज इतरांना ऐकू गेला पाहिजे त्यांच्या अबोध मनाचा प्रचंड खजिना खुला झाला तर तो सर्वांना दीपवून टाकेल. [मुळीक. ब (2022) भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान]

विद्यार्थिनींच्या निरीक्षणानुसार, पुढील पाच वर्षांत समाजातील स्त्रियांच्या भूमिकेत सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तन होण्याची अपेक्षा आहे. स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात पुढे जात असल्या तरी, त्यांना उपभोग्य वस्तू म्हणून पाहण्याची मानसिकता अद्याप कायम आहे. या मानसिकतेत बदल घडवून आणण्यासाठी शिक्षण, कौटुंबिक समर्थन, आर्थिक स्वावलंबन, राजकीय सहभाग, कायदेशीर संरक्षण आणि निर्णय क्षमता या घटकांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण प्रणाली आणि आरोग्य सेवा या क्षेत्रांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. यामुळे त्यांना अधिक संधी आणि सुविधा मिळतील, ज्यामुळे समाजातील त्यांची भूमिका अधिक प्रभावीपणे बजावता येईल.

**संदर्भ**

1. अत्तार.स (2022) भारतीय समाजात स्त्रियांचे स्थान : काल आज आणि उद्या
2. डॉ.मुळीक. ब (2022) भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान
3. Kapoor, R. (2021). Understanding the roles of women within society. University of Delhi.)
4. loksatta.com/caree-vrutantta/careervrutant-lekh/changing-the-status-0f women-in- india-society-1160190/